# तुला खांद्यावर घेईन

तूच सुखकर्ता तूच दुःखहर्ता, अवघ्या दिनाच्या नाथा
बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे, चरणी ठेवितो माथा ॥

पहा झाले पुरे एक वर्ष, होतो वर्चाने एकदा हर्ष
गोड अन्नाचा होतो रे स्पर्श, घ्यावा संसाराचा परामर्श
पुऱ्या वर्षाची साऱ्या दुखाची, वाचावी कशी हि गाथा ॥

पहा आली कशी आज वेळ, कसा खर्चाचा बसावा मेळ,
गुळ फुटणे खोबर नि केळ, साऱ्या प्रसादाची केली भेळ,
करी भक्षण आणि रक्षण, तूच पिता तूच माता... ॥

नाव काढू नको तांदळाचे, केले मोदक लाल गव्हाचे
हाल ओळख साऱ्या घराचे, दिन येतील का रे सुखाचे
सेवा जाणून गोड मानून घ्यावा आशीर्वाद आता..... ॥

t

eAstroHelp